# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/८५४७/२०१८

पुणे शहर, दिनांक – १५.०९.२०१८

**विषय :- हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कलम- २७९ भा.द.वि. प्रमाणे खटले दाखल केले बाबत.**

--------oo--------

पुणे शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालणेकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया कलमाखाली विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते.

पुणे शहरात अपघात टाळणेसाठी व वाहतूकीस शिस्त लागणेसाठी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनांवरुन पोलीस उप आयुक्त,वाहतुक, तेजस्वी सातपुते यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर वाहतूक शाखेतर्फे आज दिनांक १५/०९/२०१८ रोजी रहदारीत हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालविणा-या एकुण **४७ वाहनचालकांवर कलम- २७९ भा.द.वि. प्रमाणे** पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याप्रमाणे **<u>हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालविणारे</u>** वाहनचालकांविरूध्द विशेष मोहिम यापुढेही चालू राहणार आहे.

नागरीकांना याद्वारे असे आवाहन करण्यात येते की, वाहन चालविताना हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालविल्यामुळे अपघात होत असून त्याप्रमाणे वाहन चालवू नये, सदरच्या अपराधाबाबत ६ महीने कैद व १०००/- रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. तरी वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.